Vol 4 Issue 9 March 2015 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

.....More

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-9 | March-2015
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

तुकोबांचे कवित्व : आत्मसामर्थ्याचा आविष्कार

राजेश मिरगे

यशवंतराव सहाय्यक प्राध्यापक,मराठी विभाग,श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.

सारांश :- संत तुकारामाच्या आत्मानुभूतीतून प्रखर अभिव्यक्तीचे आविष्कारण अभंगगाथेत आहे. 4500 हून अधिक अभंग तुकोबांच्या व्यक्तिमत्वाला स्पष्ट करणारे असून व्यक्तित्व–कवित्व–संतत्व या तीन 'त्व' चा विचार अभंगगाथेतून अभिव्यक्त होतो. तुकोबांचा व्यक्ती म्हणून विचार केला तर, एक सामान्य संसारी पुरूष, व्यवहारदक्ष संसारी अशी प्रतिमा उभी राहते. पण संसारात आलेल्या अनेक संकटामुळे यातना सहन करत असताना विठोबाला शरण गेलेले तुकोबा आणि आपल्या आर्तःउत्कट भक्तिरसात न्हाऊन निघालेले तुकोबा आणि या सर्व साधकसिध्द अवस्थेच्या प्रक्रियेत स्वतःच्या मनाशी संवाद साधून 'आत्मज्ञानाच्या साक्षात्काराची' अनुभूती प्राप्त झाल्यावरचे साक्षात्कारी तुकोबा आपल्या दृष्टीसमोर उभे राहतात. तुकोबांच्या काव्याच्या आविष्काराचा विचार जेव्हा पुढे येतो तेव्हा तुकोबांची समर्थवाणी गेल्या 400 वर्षापासून भक्त–भाविक वाचकांच्या मनावर तर अधिराज्य तर करीतच आहे, पण पुढे अनेक युगे ते राज्य करेल कारण तुकोबा हे युगकवी आहेत.

प्रस्तावना

तुकोबांच्या कठोर आत्मपरीक्षणातून अभंगवाणी प्रसृत झाली. त्यातील विचार हे कठोर मृदू आणि परिणामकारक असे आहेत. पण सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या वाणीला त्यांच्या मनाच्या चिंतनाचा सुगंध प्राप्त झाला आहे, त्या शब्दांना तुकोबांच्या आत्मशक्तीचे आत्मतेज, सामर्थ्यांचा आविष्कार प्राप्त होतो. वारकरी संतांच्या मालिकेत हे आत्माविष्काराचे तेजोवलय तुकोबांच्या वाणीला प्राप्त झाले. तुकोबांच्या कवित्वाला आत्माविष्काराचा सुगंध आहे. या सुगंधाला तुकोबांच्या स्वानुभवाचा स्पर्श झाल्यामुळे अनेक युगाची प्रतिनिधीक प्रतिक्रिया व्यक्त करणारी कविता म्हणून तिचा विशेषत्वाने उल्लेख केल्या जातो.

''कविता म्हणजे शब्दांतून प्रकट झालेले कवीचे व्यक्तित्व असते. केवळ जुळवलेले शब्द व्यक्तित्वहीन असतात. कवीने केलेल्या शब्दांचा खेळ असेच त्याचे स्वरूप असते. शब्द हे साहित्याचे मूलद्रव्य आहे हे खरे. हृदयाचा जिव्हाळा ज्यात नसतो असे शब्द क्षणभर रंजन करू शकतात. तुकारामांची कविता एका विशिष्ट अर्थाचा, भावनेचा, विचाराचा मागोवा घेत जाते ती शब्दांतून निर्माण झालेली व शब्दातच हरवून कविता नाही. आपल्या मूलभूत उद्दिष्टांशी तिने सदैव इमान राखले आहे. तुकोबांचे इमान हे मुख्यतः स्वतःशी होते. विशिष्ट ध्येय आकांक्षा तुकोबांच्या कवित्वामागे होती ती म्हणजे जनकल्याण, जनजागृती. तत्कालीन समाज व्यवस्थेत प्रस्थापितांनी केलेले अनन्वित अत्याचार आणि सत्यधर्माविषयी केलेली दिशाभूल तुकोबांना अस्वस्थ करीत होती. त्याची झळ तुकोबांना सुद्धा बसली होती या स्वानुभवावरून तुकोबांच्या कवित्वाला मानवतेचा स्पर्श झालेला होता. केवळ शब्दांची पंचरंगी कसरत करून यमकाला यमक जोडून चमत्कारिक, विस्मयकारक शब्दांची जुळवणी करावी असे तुकोबांना कधीच वाटले नाही उलट अशा शब्दपंडितांचा त्यांनी निषेधच केला. तुकोबांचे कवित्वाला जीवनानुभवाचा स्पर्श होता. त्यात आंतरिक तळमळ होती. तळमळीचे शब्द हे वाचकाला साधकाच्या अंतःकरणाला स्पर्श करतात. तुकोबांना आपल्या मनातील जनकल्याणाचा जागृतीचा भाव शब्दरूपातून व्यक्त करायचा आहे म्हणूनच ते म्हणतात की माझ्याजवळ शब्दाशिवाय काहीच नाही.

'तुकोबांची गाथा' ही कवित्वाचीच नैतिक, आध्यात्मिक, ऐहिक पारलौकिक, सामाजिक, वैयक्तिक, सांस्कृतिक आणि कलात्मक अशी अविच्छिन्न आणि समावेशक व्याख्याच आहे. जीवनानुभवाचे वास्तव चित्रण तुकोबा करतात. जीवनातील सत्य असत्याशी त्यांनी केलेला संघर्ष आणि त्या संघर्षातून अभिव्यक्त झालेली अभंगवाणी थेट वाचकाच्या हृयाचा ठाव घेते. तुकोबांचे कवित्व आणि संतत्व यांचा अनुबंध आहे. केवळ कवित्व असणे म्हणजे त्या कवीच्या शब्दातून मानवता, नैतिकता प्रकट होईल असे नाही याउलट तुकोबांचे संतत्व हे कवित्वाला आंतरिक तळमळ प्रदान करून युगधर्माची कविता आकारास येते. तुकोबांच्या कवित्वात मराठी भाषेचा कसदारपणा तर आलाच आहे पण याच बरोबर तुकोबा हा महाकवी असल्याचा प्रत्ययकारी अनुभव हा अलीकडे चिंतन करून नव्याने विश्लेषण करणा–या समीक्षकामध्ये झाला. तुकोबांच्या कवित्वात महाकाव्याचे सारे संदर्भ स्पष्ट होतात. ''ज्ञानेश्वरांची ओवी आणि तुकोबांचा अभंग हे ओवी आणि अभंगाचे रचनादृष्ट्या मान्य झालेले परिणाम आहेत. तुकोबा एवढा

अभंगांचा समर्थ आविष्कार एकूणच संतकाव्यात दुर्मिळ आहे. संपूर्ण अभंगात तुकोबांचे व्यक्तिमत्व समग्रपणे आपल्या समाजाचे आणि राष्ट्राचे मानवतावादी मूल्य सूचित करणारे आहे. तुकोबांचे काव्य सामाजिक आणि धार्मिक मूल्यनिर्मिती करणारे काव्य आहे. म्हणूनही ते महाकाव्य या संज्ञेत पात्र उरते.'' तुकोबांच्या गाथेची महाकाव्याशी तुलना यामुळेच होते याचे कारण म्हणजे तुकोबांनी केवळ कोरड्या शब्दांचा आविष्कार केला नाही तर त्यांनी समाजातील, धर्मातील 'खल' नाहीसे होण्यासाठी त्यांची वाणी कठोर तर झालीच पण नैतिक व सदाचार बीज समाजात पेरले तसेच त्यांच्या कवितेतून काव्यमूल्यांचे प्रगटीकरण झाले आहे. त्यात प्रासादिकता, कलात्मकता, संवादात्मकता, भावरम्यता, रसोत्कटता आहे पण याचबरोबर तुकोबांची अनुभवजन्यता जी आहे ते कवितेला अधिक सौंदर्य प्रदान करते. तुकोबांच्या गाथेतील तत्त्वज्ञान आणि उपदेश हा सार्वत्रिक समाजाच्या जागृतीसाठी कटिबद्ध आहे जीवनातील सत्याचा शोध घेणे हा तिचा धर्म आहे.

तुकोबांची कविता ही 'आत्मस्वर' आहे. हा आत्मस्वर प्रत्येक सामान्य, दीनदलित गोर–गरीब बहुजन वर्गाचा आहे. तोच आवाज त्यांनी बुलंद केला. तुकोबांचे कवित्व हे आध्यात्मिक अनुभूतीचा परिचय करून देणारे आहे त्यांच्या अभंगांना गुंतून न ठेवता तुकोबांच्या विश्वव्यापक पुरोगामी दृष्टी देणा–या विचारांना अभिव्यक्त होणे ही काळाची गरज आहे तुकोबांच्या शब्दकळा ह्या सुभाषितासारखे रूप धारण करतात. म्हणूनच ते नित्य नूतनतेचा परिचय वाचक भक्ताला देतात.

❖ ''जया अंगी मोठेपण। तया यातना कठीण।।
❖नीचपण बरवे देवा। न चले कोणाचाही दवा।।
❖ असाध्य ते साध्य करीता सायास। कारण अभ्यास तुका म्हणे।।
❖ नम्र जाला भूता। तेणे कोंडिले अनंता।।
❖ मुखी अमृताची वाणी। देह वाचावा कारणी।।
❖सत्य तोचि धर्म असत्य ते कर्म।।''(तु.शा.गा.)

तुकोबांच्या कवित्वातील आशय हा निखळ सत्य सांगणारा आहे.

मुख्यपृष्ठासाठी सार

''अवतरणे ही मानवी अनुभूतीतील मौलिक सत्यरूपे असतात. एका समर्थ व्यक्तीची अनेक व्यक्तींना जाणवणारी व पटणारी ती आदर्श वचने असतात. मॅथ्यू आर्नल्ड या इंग्रजी कविसमिक्षकाने तर कवितेचे वर्णनच पुढीलप्रमाणे केले आहे. श्च्वमजतल पे दवजीपदह समे जींद जीम उवेज चमतमिबज ेचममबी व िउंद जींज पद ीपबी ीम बवउमे दमंतमेज जव इमपदह ंइसम जव नजसमत जीम जतनजीश तुकारामाच्या अवतरणाक्षम कवितेला ही व्याख्या रूप वर्णनही यथार्थपणे लागू पडते. आपल्या कवितेविषयी तुकारामाची कल्पना चमतमिबज ेचममबी अशीच होती आणि त्याचा आत्मविश्वास तर या बाबतीत आकाशाएवढा होता. या आकाशाएवढ्या आत्मविश्वासाने तुकोबांची वाणी आत्मसंवादरूप धारण करून आविष्कृत होते. तुकोबांच्या कवित्वाचा 'झरा' मानवी जीवनाचा हुंकार असून त्यासाठी त्यांच्या कवित्वाची आर्त तळमळ प्रगट होते. तुकोबांचे कवित्व, तिचा विकास, तिचा धर्म हा 'मानवता धर्म' मानणारा असून ख–या अर्थाने जनसामर्थ्याच्या आविष्कार असून तिने जनसामान्याची भाषा धारण केली आहे. त्यातील मूल्ये पुढील अनेक युगाचा धर्म मांडणारी असून कधीही न भंग पावणारी त्यांची अभंगगाथा अमरत्वाचे रूप धारण केल्याशिवाय राहत नाही.

तुकोबांचे कवित्व : आत्मसामर्थ्याचा आविष्कार

संत तुकारामाच्या आत्मानुभूतीतून प्रखर अभिव्यक्तीचे आविष्कारण अभंगगाथेत आहे. 4500 हून अधिक अभंग तुकोबांच्या व्यक्तिमत्वाला स्पष्ट करणारे असून व्यक्तित्व–कवित्व–संतत्व या तीन 'त्व' चा विचार अभंगगाथेतून अभिव्यक्त होतो. तुकोबांचा व्यक्ती म्हणून विचार केला तर, एक सामान्य संसारी पुरूष, व्यवहारदक्ष संसारी अशी प्रतिमा उभी राहते. पण संसारात आलेल्या अनेक संकटामुळे यातना सहन करत असताना विठोबाला शरण गेलेले तुकोबा आणि आपल्या आर्तःउत्कट भक्तिरसात न्हाऊन निघालेले तुकोबा आणि या सर्व साधकसिध्द अवस्थेच्या प्रक्रियेत स्वतःच्या मनाशी संवाद साधून 'आत्मज्ञानाच्या साक्षात्काराची' अनुभूती प्राप्त झाल्यावरचे साक्षात्कारी तुकोबा आपल्या दृष्टीसमोर उभे राहतात. तुकोबांच्या काव्याच्या आविष्काराचा विचार जेव्हा पुढे येतो तेव्हा तुकोबांची समर्थवाणी गेल्या 400 वर्षापासून भक्त–भाविक वाचकांच्या मनावर तर अधिराज्य तर करीतच आहे, पण पुढे अनेक युगे ते राज्य करेल कारण तुकोबा हे युगकवी आहेत. तत्कालीन युगाची आर्त स्पंदने त्यांच्या अभंगगाथेत आहेत. तुकोबांची कविता जनमानसाला आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त करते त्यातून ती व्यक्ती स्वतःशी संवाद साधते आणि त्यातून जे चिंतन त्याला भावते ते तो आचरणात आणतो ही किमया तुकोबांच्या अभंगवाणीत आहे. प्रा. वा. ल. कुलकर्णी म्हणतात "तुकाराम जसा ख–याखु–या अर्थाने अंतर्मुख आहे तसाच बहिर्मुख आहे. तो अत्यंत कठोरपणे आत्मपरीक्षण करतो. सत्याचे स्वरूप नीट दृष्टीसमोर यावे म्हणून, शब्दरूपाने अभिव्यक्त करतो. आत्मपरीक्षणात, आत्मसंशोधनात दंग झालेले तुकाराम आपण त्यांच्या कितीतरी अभंगातून दिसतो. तुकारामाच्या अभिव्यक्तीत जशी लाचारी नाही. तसाच दर्पही नाही. जशी प्रौढी नाही तशीच भीरूताही नाही त्याला सत्य, जिज्ञासा आहे. परंतु तो संशयात्मक नाही. निष्ठुर आत्मपरीक्षण आणि तितकेच कठोर समाज परीक्षण त्याच्या अभंगातून आढळते." तुकोबांच्या कठोर आत्मपरीक्षणातून अभंगवाणी प्रसृत झाली. त्यातील विचार हे कठोर मृदू आणि परिणामकारक असे आहेत. पण सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या वाणीला त्यांच्या मनाच्या चिंतनाचा सुगंध प्राप्त झाला आहे, त्या शब्दांना तुकोबांच्या आत्मशक्तीचे आत्मतेज, सामर्थ्यांचा आविष्कार प्राप्त होतो. वारकरी संतांच्या मालिकेत हे आत्माविष्काराचे तेजोवलय तुकोबांच्या वाणीला प्राप्त झाले. तुकोबांच्या कवित्वाला आत्माविष्काराचा सुगंध आहे. या सुगंधाला तुकोबांच्या स्वानुभवाचा स्पर्श झाल्यामुळे अनेक युगाची प्रतिनिधीक प्रतिक्रिया व्यक्त करणारी कविता म्हणून तिचा विशेषत्वाने उल्लेख केल्या जातो. तुकोबा हे

प्रापंचिक, त्यांच्या जीवन प्रवासात त्यांना आलेले जनअनुभव व त्यातून त्यांना आसुरी प्रवृत्तीशी करावा लागलेला संघर्ष यामुळे तुकोबांच्या अभिव्यक्तीत कठोरता आणि प्रखरता आपल्याला दिसून येते. त्यांनी केलेला बोध स्पष्ट आणि खणखणीत आहे त्यांच्या वाणीला तेजस्विता प्राप्त झाली आहे.

मऊ मेणाहून आम्ही विष्णूदास कठीण वज्रास भेदू ऐसे ।। 1 ।।
भले तरि देऊ गांडीची लंगोटी। नाठ्याला चि गाठी देऊ माथां ।। (987 तु.शा.गा.)

तुकोबांची अभंगवाणी मेणाहून मऊ पण तेवढीच कठोर साक्षात् दगडाला भेदणारी आहे. तुकोबांचा हा प्रखर आत्माविष्कार त्यांच्या सांसारिक जीवनातील अनेक कटू अनुभवसत्ये स्विकारल्यानंतर आला. तुकोबांनी सांसारिक जीवनातील असारतेचा अनुभव घेतल्यावर विठोबाच्या आर्त धावा केला. साधक सिद्धावस्थेत विठोबांची उत्कट भक्ती हा तुकोबाचा आधार होता. त्यांच्या चिंतनमय भक्तिमय कालखंडात त्यांनी जीवनातील अनेक अनुभव सत्याच्या, स्वतःच्या विवेकावर तपासून पाहिले. ते म्हणतात – 'सत्य असत्याचे मन केले ग्वाही। मानियेले नाही बहुमता' स्वतःचा विवेक त्यांनी महत्त्वाचा प्रमाण मानला. सामान्यतः संसारी स्त्री–पुरूष जीवनात आलेल्या संकटांना दैववादाचा, नशिबाचा फेरा समजून, त्याला तोंड देण्याऐवजी ते संकट आहे म्हणून स्विकारतो. त्यातील सत्य–असत्याचा शोध तो घेत नाही किंवा त्याची ती मर्यादा असते. भारतीय समाजमनाचे मुळात हेच वैशिष्ट्य आहे की, तो चिकित्सक प्रवृत्तीचा नसतो. 'बहुमतांचा गलबला' हाच त्याला प्रमाण वाटतो आणि येथेच त्याचा घात होतो आणि पुढे दुर्दैवी आयुष्याचे चक्रात त्याला स्वतःला गुरफटून घ्यावे लागते. तुकोबांनी मात्र या सा–या दुर्दैवाच्या चक्राला, संकटाला भेदून भंडा–या–भामनाथ डोंगरावर जाऊन विशुद्ध निर्व्याज अंतःकरणाने पंढरपूरच्या विठोबाची निरामय भक्ती केली. खरे तर प्रत्येक व्यक्तीला आयुष्यात एखाद्या क्षेत्रात जर यशस्वी व्हायचे असेल तर प्रामाणिक प्रयत्नाची उत्कटता, तळमळ आणि निष्ठा या मूल्यांची गरज असते. जळी, स्थळी, पाषाणी जे जीवित ध्येय साध्य करायचे आहे ते दृष्टिपथात असणे गरजेचे असते. तरच त्याला साक्षात् अनुभूती आल्याशिवाय राहणार नाही. तुकोबांनी भक्तिरसात न्हाऊन विवेकाने विठोबाशी संवाद साधला. त्यांना स्वतःच्या आत्म्याची अनुभूती आली यालाच आपण विठ्ठलाचा साक्षात्कार झाला असे मानतो. तुकोबांना ज्ञानाचा, बोधाचा जो साक्षात्कार झाला त्या साक्षात्कारामागे त्यांनी अंतर्मनापासून केलेली भक्ती, सदाचार आणि नीति ही कारणीभूत ठरली. तुकोबांना स्वतःच्या अंतःसामर्थ्याची जाणीव झाली त्यामुळेच तुकोबांनी समाज, देशहितासाठी स्वतःला वाहून घेतले. कारण तुकोबांचा हा कळवळा हा जनकळकळा आहे या स्फूर्तीतूनच तुकोबांच्या शब्दांना आकार, उकार प्राप्त होऊन नैतिक सद्विचाराच्या परखड, तेजस्वी, विधायक दिशा देणा–या अभंगवाणीचा जन्म झाला असे आपल्याला म्हणता येते.

कवित्वाची प्रेरणा संत नामदेवांनी दिली, असे तुकोबा म्हणतात –
''नामदेवे केले स्वप्नामाजी जागे। वाऊगे निमित्य बोलो नका ।।1।। धृ।।
सांगितले काम करावे कवित्व। वाऊगे निमित्य बोलो नका ।।छ।।
माप टाकी सळे धरिली विठ्ठले। थापटोनी केले सावधान ।।2।।
प्रमाणांची संख्या सांगे शत कोटी। उरले ते शेवटी लावी तुका''।।3।। (1320 तु.शा.गा.)

साक्षात स्वप्नात येऊन पांडुरंगासह नामदेवानी कवित्वाची प्रेरणा दिल्याने तुकोबा मानतात. शतकोटी अभंग करण्याची प्रतिज्ञा ही तुकोबांच्या व्यक्तिमत्त्वातील आत्मविश्वास प्रगट करणारी आहे. तुकोबांच्या साडेसार हजार अधिक अभंगातून तुकोबांची 'तुका म्हणे' ही नाममुद्रा आविष्कृत झाली. तुकोबा आपल्या साधकावस्थेत विठोबाच्या भक्तीत न्हाऊन गेले. पण संत नामदेवांना ते गुरू म्हणून स्मरण करत होते. तुकोबांनी आपल्या कवित्वातून भक्तियोगाची मीमांसा करताना नामभक्तीचा, नामस्मरणाचा प्रेरणादायी विचार मांडला. या नामभक्तीची प्रेरणा तुकोबांना कवित्व निर्मितीसाठी मिळाली. तुकोबांना जीवनातील विविध क्षेत्रातील अनुभव आले होते. त्या अनुभवाची प्रेरणा मिळाल्याबरोबरच ती शब्दरूपाने अवतरली. ''कविता म्हणजे शब्दांतून प्रकट झालेले कवीचे व्यक्तित्व असते. केवळ जुळवलेले शब्द व्यक्तित्वहीन असतात. कवीने केलेल्या शब्दांचा खेळ असेच त्याचे स्वरूप असते. शब्द हे साहित्याचे मूलद्रव्य आहे हे खरे. हृदयाचा जिव्हाळा ज्यात नसतो असे शब्द क्षणभर रंजन करू शकतात. तुकारामांची कविता एका विशिष्ट अर्थाचा, भावनेचा, विचाराचा मागोवा घेत जाते ती शब्दांतून निर्माण झालेली व शब्दातच हरवून कविता नाही. आपल्या मूलभूत उद्दिष्टांशी तिने सदैव इमान राखले आहे. तुकोबांचे इमान हे मुख्यतः स्वतःशी होते. विशिष्ट ध्येय आकांक्षा तुकोबांच्या कवित्वामागे होती ती म्हणजे जनकल्याण, जनजागृती. तत्कालीन समाज व्यवस्थेत प्रस्थापितांनी केलेले अनन्वित अत्याचार आणि सत्यधर्माविषयी केलेली दिशाभूल तुकोबांना अस्वस्थ करीत होती. त्याची झळ तुकोबांना सुद्धा बसली होती या स्वानुभवावरून तुकोबांच्या कवित्वाला मानवतेचा स्पर्श झालेला होता. केवळ शब्दांची पंचरंगी कसरत करून यमकाला यमक जोडून चमत्कारिक, विस्मयकारक शब्दांची जुळवणी करावी असे तुकोबांना कधीच वाटले नाही उलट अशा शब्दपंडितांचा त्यांनी निषेधच केला. तुकोबांचे कवित्वाला जीवनानुभवाचा स्पर्श होता. त्यात आंतरिक तळमळ होती. तळमळीचे शब्द हे वाचकाला साधकाच्या अंतःकरणाला स्पर्श करतात. तुकोबांना आपल्या मनातील जनकल्याणाचा जागृतीचा भाव शब्दरूपातून व्यक्त करायचा आहे म्हणूनच ते म्हणतात की माझ्याजवळ शब्दाशिवाय काहीच नाही.

''आम्ही घरी धन शब्दांचीच रत्ने। शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।।1।।धृ।।
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्द वाटू धन जनलोका ।।2।।
तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव । शब्देची गौरव पूजा करू ।।3।।'' (3396 तु.शा.गा.)

परमेश्वराचे पूजन शब्दांतच करायचे अशी भावना त्यांच्या मनात आहे. शब्द हे रत्ने आहेतच, पण वेळप्रसंगी त्या शब्दांचा

शस्त्रासारखा वापर करण्याची कुवत स्वतः जवळ असल्याचे ते मानतात. शब्दाप्रती असणारी तुकोबाची प्रचंड निष्ठा आणि मानवतेचा हृदयस्पर्शी भाव त्यांच्या शब्दातील प्रत्ययकारी सुगंध आपल्याला देतो.

तुकोबांची कविता ही कृत्रिमतेने तयार झाली नाही. ती सहजतेने अभिव्यक्त झाली. 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' हे तुकोबांच्या कवितेचे आंतरिक वैशिष्टय आहे. मुळातच कवी म्हटले की, त्याचे ठिकाणी आंतरिक भावनेची ओल असते. भावविचाराची ओल नसेल तर, कविता आविष्कारित होवू शकत नाही. भाव विचार नसतांना सुद्धा हव्यास असणारे कवी अक्षरशः त्यासाठी धडपडत असतात आणि म्हणूनच अशा कवींच्या शब्दांना ना मोल ना भक्ती, ना जिव्हाळा असतो फक्त शाब्दिक जंजाळ उभे ते करू शकतात. क्षणभर त्यांच्या चमत्कारिक शब्दांची भूल वाचकांना पडते. ज्याप्रमाणे चित्रपटातील गाणी काही काळ लोकप्रियता मिळवतात, पण नंतर ती लुप्त होतात तसेच या तथाकथित कवीचे सुद्धा असते. पण तुकोबांचे काव्य युगधर्म सांगणारे आहे त्यांच्या प्रत्येक शब्दात आत्माविष्कार आहे तुकोबांची आत्माविष्कार आणि त्यातून आविष्कृत झालेली कविता कृत्रिम नाही. तुकोबा म्हणतात–

''जोडिली अक्षरे। नव्हती बुद्धीची उत्तरे ।।1।।धृ ।।
नाही केली आटी। काही मानदंभासाठी ।।छ।।
कोणी भाग्यवंत। तया कळेल उचित ।।2।।
तुका म्हणे झरा। आहे मुळीचा चि खरा'' ।।3।। (3500 तु.शा.गा.)

तुकोबांनी कवित्वासाठी शब्दांची जुळवणूक केली नव्हती किंवा प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी खटाटोप केला नव्हता. तुकोबांना आपल्या शब्दातून पांडित्याचे प्रदर्शन करण्याची आकांक्षा नव्हती तर मानवकल्याण हेतूसाठी तुकोबांची अभंगवाणी अवतरली होती तुकोबा विनयाने म्हणतात की ''तुका म्हणे झरा। आहे मुळीचा चि खरा।'' खरोखर काही लोकांमध्ये मुळातच प्रतिभेचा स्फुल्लींग असतो तो प्रज्वलित झाला म्हणजे त्यातून कलेचा जन्म होतो. तुकोबाच्या कवित्वाची ही प्रतिभा मुळातच होती. भक्तियोगाच्या, ज्ञानयोगाच्या साक्षात्कारामुळे तुकोबांची प्रतिभा स्फुरली. माणसाच्या ठायी असणारी खरी प्रतिभा, गुण कधीच लपत नाही. ते गुण लोकांसमोर आल्याशिवाय राहत नाही. कलाकाराची काव्यप्रतिभा अभिव्यक्त होतच असते. फक्त त्याला आवश्यकता असते संधीची. ती मिळाली म्हणजे तो त्या संधीचे सोने केल्याशिवाय राहत नाही. तुकोबांच्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास

''न लगे चंदना पुसावा परिमळ। वनस्पती मेळ हाकारूनी।।1।। ।।धृ।।
अंतरीचे धांवे स्वभावे बाहेरी। धरितां ही परि आवरेना ।।छ।।
सूर्य नाही जागे करीतया जना। प्रकाश किरणा कर म्हणू ।।2।।
तुका म्हणे मेघ नाचवी मयूरे। लपविता खरे येत नाही।।3।।

(150 विष्णुबुवा जोग संपादीत सार्थगाथा)

ज्याप्रमाणे चंदनाचा सुगंध लपविता येत नाही त्याप्रमाणे मूळ प्रतिभा जर असेल तर ती कोणी कितीही लपविण्याचा प्रयत्न केला तरी आविष्कृत झाल्याशिवाय राहत नाही. 'सत्य' हे लोकांसमोर येते, त्याचप्रमाणे अंतःकरणात जर जनसामान्याविषयी जिव्हाळा, प्रेम असेल तर तो कळवळा अंतरंगातून व्यक्त होतो. तुकोबांचे कवित्व हे लोकजागृतीसाठी आहे. जीवनातील असत्याची पारख केल्यानंतर आलेल्या अनुभवांना शब्दांकित करून जनसामान्यांना दिशा देण्याचे महान कार्य तुकोबाचे अभंग करतात. तुकोबांच्या कवित्वाचा उगम, विकास हा भक्तियोगातून झाला. विठोबाची नामभक्ती ही तुकोबांच्या कवित्वाचा उगम ठरतो.
''मानियेला स्वामी गुरूचा उपदेशे। धरिला विश्वास दृढ नामी।।
यावरी जाली कवित्वाची स्फूर्ती।। पाय धरिले चित्ती विठोबाचे।।'' (तु.शा.गा.)
कवित्व उगमाविषयी तुकोबांची विठोबाविषयी असलेली ही आत्यंतिक श्रद्धा आहे. या श्रद्धेतून कवितेचा उगम झाला. त्याचबरोबर तुकोबांच्या अभंगांना कृतिशील भक्तीचा गंध प्राप्त झाला. तुकोबा आपल्या कवित्वाविषयी अतिशय विनयाने म्हणता –

''संतांची उच्छिष्टे बोलतो उत्तरे। काय म्यां गव्हारे जाणावे हे ।।1।। धृ।।
तुका म्हणे मज बोलवितो देव। अर्थ गुह्य भाव तो चि जाणे'' ।।4।। (919 तु.शा.गा.)

संतांची वचने ही माझ्या कवित्वाचे स्त्रोत आहे, ती माझी प्रेरणा आहे. माझे कवित्व 'बोबडे बोल' आहेत असे तुकोबा विनयाने म्हणतात. पण हे बोबडेबोल विठोबाच्या नामभक्तीचे समर्थपणे गायन करतात. या गायनातून, चिंतनातून तुकोबांच्या आत्म्याला स्फूर्ती प्राप्त होते. तुकोबांची अनन्यसाधारण भक्तीचा हा प्रत्यय आहे. ''ईश्वरविषयक श्रद्धेचे सामर्थ्य लाभल्यावर तुकोबा मुक्त मनाने व मुक्त कंठाने गा७ लागले. शब्दाचा उगम आपल्या हृदयात असलेल्या परमेश्वरी बळाने होत आहे हे त्यांच्या मनाने पुरते घेतले होते. कवीच्या, कलावंताच्या श्रद्धेचे असे एखादे स्थान असावे लागते. ज्याच्या मनाला कोणत्याच श्रद्धेचे अधिष्ठान नाही. त्याच्या लेखणी वाणीत आत्मप्रत्यय कुठून येणार? तुकोबांच्या कवित्वाला भक्तीचे श्रेष्ठतम असे अधिष्ठान प्राप्त झाले होते. तुकोबांची कविता मुळात विठ्ठलाच्या भक्तीच्या अंतःसामर्थ्यानेच आविष्कृत झाली आहे. तिचा मूळ गाभा भक्ती हा असून जनकल्याणासाठी सत्य, असत्याचा अन्वयार्थ लावण्यास वेळप्रसंगी ती उपदेश करताना कठोर आणि परखड झाली होती. भक्तीभावनेचे श्रेष्ठत्व आणि भक्तीच्या अभिव्यक्तीचे विविध प्रकार याविषयी तुकोबांचे अभंग सर्वश्रेष्ठ आहेत ''पिंटू भक्तीचा डांगोरा' या शब्दात तुकोबांनी वारकरी भक्तामध्ये स्फूर्ती निर्माण केली. ज्ञान–कर्माच्या जोडीला भक्तीचे श्रेष्ठत्व आविष्कृत होणे हाच माझ्या कवितेचा धर्म असल्याचे प्रतिपादन तुकोबा करतात. भक्तीविषयी असणारी तुकोबांच्या मनात असणारी मूलभावना त्यांच्या आत्माविष्काराचा एक

मूलगामी भाग आहे. विठ्ठलाविषयीची उत्कटता ते व्यक्त करतात.

विठ्ठलांची उपासना हेच आपल्या कवित्वाचे जीवित ध्येय तुकोबा मानत नामभक्तीचा पुरस्कार करतात. या नामभक्तीतून तुकोबांचा सदाचार आणि नीतीधर्माचे प्रगटीकरण व्यक्त होते.

❖नाम घेता मन निवे । जिव्हे अमृताचि स्त्रवे ।। (1382 तु.शा.गा.)
❖आम्ही घ्यावे तुझे नाम। तुम्ही असो द्यावे प्रेम ।। (1066 तु.शा.गा.)

तुकोबांच्या या नामभक्तीतून शुद्धतेचे बीज भक्तांच्या हृदयी वास करते. ही नामाप्रति असणारी उत्कट भावना त्यांच्या अंर्तःसामर्थ्याचा विकास करते आणि त्यातूनच एक समर्थ संपन्न, नीतिवान व्यक्तीचा जन्म होतो. म्हणून तुकोबांच्या कवित्वाची विठ्ठला विषयीची श्रद्धा, भक्ती अभंगगाथेत प्रतिबिंबित झालेली दिसते. कारण तुकोबांच्या कवित्वाचा मूलस्त्रोत हा विठोबाच आहे. ''तुकोबांची अभंगवाणी विठ्ठल प्रेमाने रंगलेली आहे. त्यात स्वानुभूतीचे तेज आहे. भक्तीचा जिव्हाळा आहे. नामसंकीर्तनाचा, संतमाहात्म्याचा भक्तीतत्वाचा जयजयकार आहे. तुकोबाच्या अत्यंत पावन, मंगल अशा वाणीने समकालीनच नव्हे तर आजही लोक भारावलेले आहेत. अभंगाची उपयुक्तता कालातीत आहे. तुकोबांच्या उपदेशात ईश्वरी भक्तीचे तेज व स्वजननाविषयी तळमळ असल्यामुळेच त्यांचा प्रभाव आज टिकून आहे.'' तुकोबांच्या भावजीवनाचा विसावा हा विठोबाच आहे. तुकोबांच्या विठोबाविषयी असणारी भक्ती त्याच्या निर्व्याज कवितेला 'अभंग' केल्याशिवाय राहत नाही. म्हणून तुकोबा श्रद्धेच्या भावनेतून कर्ता करविता तो एक भगवंत आहे असे म्हणतात–

❖ ''आपुलिया बळे नाही मी बोलत। सखा कृपावंत वाचा त्याची ।।1।। ।।ध्रु।।
साळुंकी मंजूळ बोलतसे वाणी। शिकविता धणी वेगळाची।।छ।। (2950 तु.शा.गा.)
❖ माझीये मुक्तीचा नव्हे ह्या प्रकार मज विश्वंभर बोलवितो ।।छ।।
काय मी पामर जाणे अर्थभेद। वदवी गोविंद तेची वदे ।।2।। (1007 तु.शा.गा.)

अशा भक्तिमय अभंगातून आपल्या कवित्व विकासाचे सारे श्रेय पंढरपूरच्या विठोबांना प्रदान केले. तुकोबांना जे बळ आले ते विठोबाच्या दर्शनाने. तसेच कवित्व म्हणजे हा काही युक्तीचा प्रकार नाही तर तो भगवंताचा प्रसाद जर मिळाला तर तोच गोविंद आपल्या भक्ताच्या मुखातून आविष्कृत होतो. कवित्व ही ईश्वराचीच देणगी असल्याची जाणीव तुकोबा भक्तांना करून देतात? म्हणून तुकोबांची अभंगवाणी भक्तिभावाची व श्रद्धेची दृष्टी घेऊनच त्याचा आस्वाद घ्याला लागतो. भक्त आणि विठ्ठलाच्या एकत्वाचा संयोग जेव्हा होतो तेव्हा त्याला जीवा–शिवाचा साक्षात् अनुभव प्राप्त होतो आणि काव्याची सरिता फुलल्याशिवाय राहत नाही.

तुकोबांचे काव्यप्रयोजन मानवी जीवन सुखी व्हावे हेच होते. हीच त्यांची आंतरिक तळमळ होती. या तळमळीतूनच तुकोबांची कविता आविष्कृत होते. तुकोबांचे व्यक्तित्व, कवित्व आणि संतत्व याची जर मीमांसा केली तर, कवित्वाला संतत्वाची जर जोड असेल तर ती अनेक युगांचा मानवी कल्याणाचा विचार मांडते त्यातूनच समाजाला विधायक दिशा प्राप्त होते. म्हणून तुकोबांच्या जीवनानुभाचा अभंगगाथा आविष्कार असल्याने त्याला स्वानुभवच्या आत्मप्रत्ययाचे रूप प्राप्त होते. तुकोबांची गाथा विठ्ठलाच्या गाढ श्रद्धेतूनच आकाराला आली पण व्यक्ती म्हणून संसारी पुरूष म्हणून आलेल्या अनुभवाची मांडणी आणि त्याला लोकभाषेचा कसदारपणाची जोड त्यामुळे तुकोबांच्या अभंगगाथेने समाजमनावर जबरदस्त परिणाम केला. मानवी अस्तित्वाचा ते समग्रपणे उद्घोष करतात ''जीवनातल्या वेदनेत होरपळून निघाल्यानंतर कवीच्या रूपाने पुर्नजन्म घेऊन आपल्या स्वतःच्या जीवनानुभवाचे आपल्या समकालीन मानवी अवस्थेचेच सर्वांगीण चित्रण करणारा हा कवी आहे. एका परीने 'तुकोबांची गाथा' ही कवित्वाचीच नैतिक, आध्यात्मिक, ऐहिक पारलौकिक, सामाजिक, वैयक्तिक, सांस्कृतिक आणि कलात्मक अशी अविच्छिन्न आणि समावेशक व्याख्याच आहे. जीवनानुभवाचे वास्तव चित्रण तुकोबा करतात. जीवनातील सत्य असत्याशी त्यांनी केलेला संघर्ष आणि त्या संघर्षातून अभिव्यक्त झालेली अभंगवाणी थेट वाचकाच्या हृयाचा ठाव घेते. तुकोबांचे कवित्व आणि संतत्व यांचा अनुबंध आहे. केवळ कवित्व असणे म्हणजे त्या कवीच्या शब्दातून मानवता, नैतिकता प्रकट होईल असे नाही याउलट तुकोबांचे संतत्व हे कवित्वाला आंतरिक तळमळ प्रदान करून युगधर्माची कविता आकारास येते. तुकोबांच्या कवित्वात मराठी भाषेचा कसदारपणा तर आलाच आहे पण याच बरोबर तुकोबा हा महाकवी असल्याचा प्रत्ययकारी अनुभव हा अलीकडे चिंतन करून नव्याने विश्लेषण करणा–या समीक्षकामध्ये झाला. तुकोबांच्या कवित्वात महाकाव्याचे सारे संदर्भ स्पष्ट होतात. ''ज्ञानेश्वरांची ओवी आणि तुकोबांचा अभंग हे ओवी आणि अभंगाचे रचनादृष्ट्या मान्य झालेले परिणाम आहेत. तुकोबा एवढा अभंगांचा समर्थ आविष्कार एकूणच संतकाव्यात दुर्मिळ आहे. संपूर्ण अभंगात तुकोबांचे व्यक्तिमत्व समग्रपणे आपल्या समाजाचे आणि राष्ट्राचे मानवतावादी मूल्य सूचित करणारे आहे. तुकोबांचे काव्य सामाजिक आणि धार्मिक मूल्यनिर्मिती करणारे काव्य आहे. म्हणूनही ते महाकाव्य या संज्ञेत पात्र उरते. '' तुकोबांच्या गाथेची महाकाव्याशी तुलना यामुळेच होते याचे कारण म्हणजे तुकोबांनी केवळ कोरड्या शब्दांचा आविष्कार केला नाही तर त्यांनी समाजातील, धर्मातील 'खल' नाहीसे होण्यासाठी त्यांची वाणी कठोर तर झालीच पण नैतिक व सदाचार बीज समाजात पेरले तसेच त्यांच्या कवितेतून काव्यमूल्यांचे प्रगटीकरण झाले आहे. त्यात प्रासादिकता, कलात्मकता, संवादात्मकता, भावरम्यता, रसोत्कटता आहे पण याचबरोबर तुकोबांची अनुभवजन्यता जी आहे ते कवितेला अधिक सौंदर्य प्रदान करते. तुकोबांच्या गाथेतील तत्त्वज्ञान आणि उपदेश हा सार्वत्रिक समाजाच्या जागृतीसाठी कटिबद्ध आहे जीवनातील सत्याचा शोध घेणे हा तिचा धर्म आहे.

''अनुभवे आले अंगा। ते या जगा देतसे ।।1।। ।।धृ।।
नव्हती हाततुके बोल। मूळ ओल अंतरीची।।छ।।
उतरूनी दिले कशी। शुद्धरसी सरे ते।।2।।
तुका म्हणे दुसरे नाही। ऐसी ग्वाही गुजरली।।3।।'' (2845 तु.शा.गा.)

तुकोबांची कविता अनुभवाशिवाय बोलत नाही. अनुभवाचा कसदारपणा अभंगवाणीत आविष्कृत होतो. कविता म्हणजे अंतरीचा, आत्म्याचा संवाद साधल्यानंतर सत्य–असत्याचा अनुभव पारखल्याशिवाय ती अभिव्यक्त होत नाही तुकोबांच्या प्रत्येक अभंगातील भावनेमागे त्यांच्या अंतर्मनाची साद आहे. ग्वाही आणि साक्ष प्रत्येक घटनेमागे असेल तरच ते त्यावर बोलल्याशिवाय राहत नाही. ''तुकाराम म्हणतात– मी अनुभवाच्या मुशीतून आलोय. आयुष्याच्या ठोस अनुभवाच्या मुशीतून जीव ओतून बाहेर काढता आला म्हणजे अनुभव आणि मुखातला शब्द एक होऊन काव्यात व्यक्त होतात. अनुभवरूपी वणवण केली, तेव्हा कुठे त्याचा गर्भ सापडला. अन् मग अनुभवच शब्दरूप झाला यातून तुकारामांनी काव्यनिर्मिती प्रक्रिया सांगितली. अतिउत्तम काव्यनिर्मिती हा आनंदाचा भाग आहे. तोच खरा श्रेष्ठ आनंद आहे म्हणून तुकारामांना हा आनंद सर्वांना द्यावासा वाटतो. याची गोडी फक्त तुकारामाचं सांगू शकतात'' तुकोबांची अभंगवाणी अनुभवजन्य, भावगर्भ आशयद्रव्य आणि अभिव्यक्ती आत्माविष्कारात्मक आहे. म्हणूनच तुकोबांना पंडिती शब्दज्ञानाचा तिटकारा होतो ते म्हणतात–

❖ ''वांझे ते दाविले ग–हवार लक्षण। चिरगुटे घालून वाथयाला।।1।। ।।धृ।।
❖तुका म्हणे जळो जळो ते महंती। नाही लाज चित्ती आठवण''।।4।। (3871 तु.शा.गा.)
❖ नका दंतकथा येथे सांगो कोणी। कोरडे ते मानी बोल कोण ।।1।। ।।ध्रु.।।
❖तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे। येरा गबाळाचे काय काम।।3।। (3128 तु.शा.गा.)

तुकोबांनी शाब्दिक ज्ञानाचा निषेध केला. पोटासाठी ज्ञान विकणारे तथाकथित तत्त्वज्ञानी पंडितांच्या विद्वत्तेची दांभिकता समाजासमोर आणण्याचे कार्य तुकोबांनी केले. दंतकथा यावर त्यांचा विश्वास नव्हता आणि त्याच बरोबर मनी जर भावनात्मक जिव्हाळ्याची ओल नसेल तर कवित्व करण्यात अर्थ तरी काय? असा प्रतिप्रश्न त्यांनी तथाकथित शब्दपंडितांना केला आहे. म्हणूनच तुकोबांचे कवित्व हे पढीक नव्हते तर ते वास्तवातून शब्दात आकारास आले होते. समाजाला शुद्ध, सात्विकतेचा मंत्र दे७न लोकपरंपरेतून आलेल्या दृष्टांताचा, प्रतिमांची योजकता त्यांनी आपल्या अभंगात केल्यामुळे सामान्य माणसाला सुद्धा आकलन होण्यासाठी शक्य होते. तुकोबांचे कवित्व साधे अन् सरळे स्पष्ट अशा वास्तव भूमिकेचे विचारमंथन करून लोकभोषेचे प्रत्ययकारी दर्शन करणारे आहे. तुकोबांच्या कवितेला भक्तीमयतेचा सुगंध, रोखठोक तत्वज्ञानाचा स्पर्श झालेला आहे. या सर्व गुणांचा परिचय वाचकाला, भक्ताला तुकोबांच्या गाथेतून जाणवतो. तुकोबांच्या कवित्वाची निष्ठा मुळातच भक्ती आहे आणि त्या भक्तीतून आत्मसंवादात्मक स्वरूप तुकोबाच्या गाथेला प्राप्त होते. या आत्मसंवादात्मक स्वरूपातून समाजाच्या कल्याणाची तळमळ तुकोबांच्या वाणीतून आविष्कृत होते.

''नका धरू कोणी। राग वचनाचा मनी।।1।। ।।धृ।।
येथे बहुतांचे हित। शुद्ध करोनी राखा चित्त।।छ।।
नही केली निंदा। आम्ही दूषिलेसे भेदा।।2।।
तुका म्हणे मज। येणे विण काय मज।।'' (2139 तु.शा.गा.)

ह्या अभंगातून तुकोबांच्या अंतरंगातील जनकल्याणाची तळमळ दिसून येते. बहुजनांच्या सुखासाठी, कल्याणासाठी आत्मजागृतीची ज्योत प्रज्वलित करण्याची प्रयत्नाची पराकाष्ठा तुकोबांनी आपल्या अभंगातून केली आहे. या प्रयत्नात तुकोबांच्या सामाजिक सुधारणा कार्यासाठी तत्कालीन कालखंडात प्रस्थापितांनी विरोध केला. या विरोधाशी तुकोबांना प्रचंड संघर्ष करण्याची भूमिका घ्यावी लागली. त्यासाठी तुकोबांचे कवित्व वेळप्रसंगी 'तीक्ष्ण उत्तरे हाती घेऊनी बाण फिरे' अशा स्वरूपाची होती ते म्हणतात–

''धर्माचे पाळण। करणे पाषांड खंडन ।।1।। ।।धृ।।
हे चि आम्हा करणे काम। बीज वाढवावे नाम।।छ।।
तीक्ष्ण उत्तरे। हाती घेऊनि बाण फिरे।।2।।
नाही भीड भार। तुका म्हणे साना थोर।।3।।''(2136 तु.शा.गा.)

धर्माचे म्हणजे सत्य–असत्याचे निराकरण करून सत्याला म्हणजे सात्त्विक विचारांना धर्माला जागविण्यासाठी असत् प्रवृत्तीचे खंडन करणे हा माझ्या कवित्वाचा धर्म आहे. त्यासाठी शब्दांचे तीक्ष्ण बाण अशी सार्थ उपमा आपल्या कवित्वाला देतात. यासाठी ते लहान मोठा असा भेद न मानता जो असत्यवादी आहे त्याचे निर्मूलन आणि नामभक्तीचे बीजत्वाचा मंत्र धारण करण्याची तुकोबांच्या कवित्वाची भाषा ही अप्रूप अशी आहे. तुकोबांचे कवित्व हे केवळ शाब्दिक गुंताळ्यात न पडता त्यातून लोक उद्धारासाठी ती पुढे येते. त्यासाठी तुकोबांचे कवित्व वाचक भक्ताला आत्मसामर्थ्य प्रदान करते. कारण तुकोबांची कविता ही अनुभव सेवन करून अभिव्यक्त होते. ती केवळ वाङ्मय निर्मिती नाही. ''निव्वळ भाषिक किंवा वाङमयीन निर्मिती ही शिकलेल्या शब्दांची पुननिर्मिती

असते आणि आरशातल्या अलंकारांच्या प्रतिबिंबाप्रमाणे ती मूल्यहीन असते. शिकल्या शब्दाचे उत्पादितो ज्ञान। दरपणीचे धन उपरवाया। अनुभव कडू होईन भोगिता।। अशी ओढ तुकोबांना लागून राहते. कारण कवित्वाने आविष्कार करावा असा त्यांचा आग्रह आहे. 'अर्थातरी असे अनुभव सेवन। पारिकी मन साक्ष येथे' असाही विचार तुकोबा करतात. अनुभव सेवनाशिवाय कवित्वाला त्यांनी प्रमाण मानले नाही. ती फक्त पढीक पंडितांची अलंकारिक, प्रतिमांची उजळणी होय. असे तुकोबांनी मानले म्हणूनच त्यांनी कृती आणि ऊक्तीचा समन्वय साधल्याशिवाय कवित्वात कसदारपणा उतरू शकत नाही. तुकोबांची कविता समाजातील सर्व क्षेत्रावर भाष्य करते पण त्या भाष्यामागे तुकोबांच्या अनुभवाची जोड आहे आणि म्हणूनच त्यांच्या कवित्वाचा विकास हा सहजरीत्या झाला. मानवी जीवनाचे सार कवित्वात व्यक्त होते. तुकोबांचा कवित्वाची भाषा ही मानवी परोपकाराची आहे. त्यांचा प्रत्येक विचार प्रगल्भतेकडे विवेकाकडे घेऊन जाणारा आहे.

तुकोबांची कविता ही 'आत्मस्वर' आहे. हा आत्मस्वर प्रत्येक सामान्य, दीनदलित गोर–गरीब बहुजन वर्गाचा आहे. तोच आवाज त्यांनी बुलंद केला. तुकोबांचे कवित्व हे आध्यात्मिक अनुभूतीचा परिचय करून देणारे आहे त्यांच्या अभंगांना गुंतून न ठेवता तुकोबांच्या विश्वव्यापक पुरोगामी दृष्टी देणा–या विचारांना अभिव्यक्त होणे ही काळाची गरज आहे तुकोबांच्या शब्दकळा ह्या सुभाषितासारखे रूप धारण करतात. म्हणूनच ते नित्य नूतनतेचा परिचय वाचक भक्ताला देतात.

❖''जया अंगी मोठेपण। तया यातना कठीण।।
❖ नीचपण बरवे देवा। न चले कोणाचाही दवा।।
❖असाध्य ते साध्य करीता सायास। कारण अभ्यास तुका म्हणे।।
❖ नम्र जाला भूता। तेणे कोंडिले अनंता।।
❖ मुखी अमृताची वाणी। देह वाचावा कारणी।।
❖•सत्य तोचि धर्म असत्य ते कर्म।।'' (तु.शा.गा.)

तुकोबांच्या कवित्वातील आशय हा निखळ सत्य सांगणारा आहे.

''अवतरणे ही मानवी अनुभूतीतील मौलिक सत्यरूपे असतात. एका समर्थ व्यक्तीची अनेक व्यक्तींना जाणवणारी व पटणारी ती आदर्श वचने असतात. मॅथ्यू आर्नल्ड या इंग्रजी कविसमिक्षकाने तर कवितेचे वर्णनच पुढीलप्रमाणे केले आहे. "Poetry is nothing less than the most perfect speech of man that in which he comes nearest to being able to utler the truth" तुकारामाच्या अवतरणाक्षम कवितेला ही व्याख्या रूप वर्णनही यथार्थपणे लागू पडते. आपल्या कवितेविषयी तुकारामाची कल्पना चमतमिबज`चममबी अशीच होती आणि त्याचा आत्मविश्वास तर या बाबतीत आकाशाएवढा होता. या आकाशाएवढ्या आत्मविश्वासाने तुकोबांची वाणी आत्मसंवादरूप धारण करून आविष्कृत होते. तुकोबांच्या कवित्वाचा 'झरा' मानवी जीवनाचा हुंकार असून त्यासाठी त्यांच्या कवित्वाची आर्त तळमळ प्रगट होते. तुकोबांचे कवित्व, तिचा विकास, तिचा धर्म हा 'मानवता धर्म' मानणारा असून ख–या अर्थाने जनसामर्थ्याच्या आविष्कार असून तिने जनसामान्याची भाषा धारण केली आहे. त्यातील मूल्ये पुढील अनेक युगाचा धर्म मांडणारी असून कधीही न भंग पावणारी त्यांची अभंगगाथा अमरत्वाचे रूप धारण केल्याशिवाय राहत नाही.

संदर्भग्रंथ

1.रावते का.ग. प्राचान मराठी साहित्याचे लेखन.
2.फडकुले निर्मलकुमार : संतकवी तुकाराम एक चिंतन, मेहता पब्लिशिंग, पुणे. तृतीयवृत्ती.
3.मोळक शैलजा : संपादक जगत्गुरू श्री संत तुकाराम महाराज स्मारक ग्रंथ, जिजाऊ प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती.
4.चित्रे पुरूषोत्तम : पुन्हा तुकाराम, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. पुर्नमुद्रण 2001.
5.सानप किशोर : समग्र तुकाराम, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती 2008.
6.पाठक यशवंत : तुकारामांचे अभंग, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद.
7.मोहिते शिवाजीराव : ईश्वरनिष्ठांची मांदीयाळी कर्मवीर प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती 2007.
8.संत तुकारामांची शासकीय गाथा.
9.सरदार गं.बा. : संत वाङमयाची फलश्रुती, लोकवाङमयाचे गृह प्रकाशन सातवी आवृत्ती 2006.
10.मोहरील ल.का. : तुकारामाची जीवननिष्ठा

राजेश मिरगे
यशवंतराव सहाय्यक प्राध्यापक,मराठी विभाग,श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org